B.A III Sem V Course IX

## International Economics

## Module I

## 1.3 Theories of Trade – Adom Smith

### ॲडम स्मिथ यांचा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत

प्रास्ताविक

ॲडम स्मिथ हे प्रमुख सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांना अर्थशास्त्राचे जनक असे म्हणतात. स्मिथ यांनी आपले अर्थशास्त्रीय विचार प्रामुख्याने ' An Inquiry into the Nature and Causes of Wealth of Nations' या आपल्या ग्रंथात मांडले आहेत. हा ग्रंथ सन १७७६ मध्ये प्रसिद्ध झाला आहे. हा ग्रंथ जगभर प्रसिद्ध पावला होता. या ग्रंथाची पहिली आवृत्ती पहिल्या सहा महिन्यातच संपली होती. यावरून स्मिथ यांचा 'राष्ट्राची संपत्ती' हा ग्रंथ किती महत्वाचा होता याची आपणास कल्पना येते.

ॲडम स्मिथ यांच्यापूर्वी व्यापारवादी आणि निसर्गवादी विचारवंतांनी आंतरराष्ट्रीय व्यापारासंबंधी काही विचार मांडले होते. व्यापारवादी विचारसरणीचा उगम १२ व्या शतकात तर निसर्गवादी विचारसरणीचा उगम १४ व्या शतकात झाला होता. या दोन्ही विचारसरणीचा विशेषत: व्यापारवादी विचारसरणीचा प्रभाव जगावर १८ व्या शतकापर्यंत होता. ज्यांनी आपल्या सिदधांतात, निबंधात व लेखात व्यापारावर विशेष भर दिला होता किंवा व्यापारमुळेच देशाचा आर्थिक विकास घडून येतो असे म्हटले होते त्या विचारांना 'व्यापारवाद' (Mercantilism) असे म्हणतात. १८ व्या शतकापर्यंत युरोपातील अनेक देशांच्या सरकारावर व्यापारवादयांचा मोठा प्रभाव होता. ॲन्टनी डी. मॉन्टीन (फ्रान्स), ॲन्टोनियो सेरा (इटली), फिलिप हॉर्निक (ऑस्ट्रिया), योहान बेचर (जर्मनी), थॉमस मन (इंग्लंड) हे विचारवंत व्यापारवादी विचारवंत म्हणून त्याकाळात प्रसिद्ध होते. व्यापारवाद्यांनी आंतरराष्ट्रीय व्यापार देशाला कसा लाभदायक ठरू शकेल? या संदर्भात काही विचार मांडले आहेत. त्यांच्या मते (१) देशाची आयात कमी असली पाहिजे आणि निर्यात जास्त असली पाहिजे. तरच देश श्रीमंत बनू शकेल. देशाची निर्यात आयातीपेक्षा जास्त असेल तर त्या देशाला दुसऱ्या देशाकडून सोने आणि चांदीचे साठे मिळू शकतील. ज्या देशाकडे सोने, चांदीचे साठे मोठ्या प्रमाणात असतील तो देश श्रीमंत असतो. म्हणून देशाला श्रीमंत बनवण्यासाठी देशाची निर्यात जास्त असली पाहिजे आणि आयात कमी असली पाहिजे. (२) ज्या देशाजवळ मौल्यवान धातू (सोने,चांदी) मोठ्या प्रमाणात असतात, त्या देशात वस्तू व सेवांचे उत्पादनही मोठ्या प्रमाणात होते आणि देश श्रीमंत होतो. ॲडम स्मिथ यांनी व्यापारवाद्यांच्या या विचारावर टीका केली आणि आणि संपत्तीची विस्तृत अर्थाची व्याख्या केली. कारण स्मिथ यांना व्यापारवाद्यांची संपत्तीची व्याख्या नव्हती. व्यापारवाद्यांची संपत्तीची व्याख्या संकुचित होती. देशात सोने, चांदी इत्यादीसारखा जे मौल्यवान धातूंचे साठे उपलब्ध असतात, त्याला राष्ट्राची संपत्ती असे म्हणतात अशी संपत्तींची व्याख्या व्यापारवादी विचारवंतांनी केली होती. स्मिथ यांच्या मते, 'देशाची संपत्ती म्हणजे त्या देशात उपलब्ध असलेल्या उपभोग्य वस्तू, टिकावू वस्तू, नैसर्गिक

साधनसंपत्ती आणि मानवी कौशल्य होय.'' स्मिथ यांच्या मते, चलनातील पैसा किंवा मौल्यवान धातू (सोने, चांदी) म्हणजे राष्ट्राची संपत्ती नव्हे. राष्ट्राच्या संपत्तीत सर्व प्रकारच्या वस्तू, नैसर्गिक साधनसंपत्ती आणि मानवी कौशल्य यांचाही समावेश होतो. अशा प्रकारे ॲडम स्मिथ यांनी व्यापारवाद्यापेक्षा राष्ट्राच्या संपत्तीची विस्तृत अशी व्याख्या आपल्या १७७६ च्या Wealth of Nations या ग्रंथात दिली आहे. ॲडम स्मिथ यांनी व्यापारवाद्यांच्या अनेक विचारावर टीका करून त्या विचारातील फोलपणा दाखवून दिला. त्यामुळे जगावर विशेषत: युरोपिय देशावर असणारा व्यापारवादी विचारसरणीचा प्रभाव कमी झाला आणि जगाचे लक्ष ॲडम स्मिथ यांच्या Wealth of Nations या ग्रंथाकडे वेधले गेले. ॲडम स्मिथ यांनी आपल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात आंतरराष्ट्रीय व्यापाराला (आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या विस्ताराला) महत्व दिले आहे. राष्ट्र श्रीमंत आणि सामर्थ्यशाली होण्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभाग घेतला पाहिजे असे स्मिथ यांचे मत होते. राष्ट्राला श्रीमंत आणि समृध्द बनवणे म्हणजे राष्ट्राच्या संपत्तीत वाढ घडवून आणणे होय. राष्ट्राच्या संपत्तीत वाढ घडून आली तर राष्ट्र श्रीमंत बनते. त्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यापार महत्वाचा आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार वाढायचा असेल तर आंतरराष्ट्रीय व्यापारावरील बंधने जाचक अटी काढून टाकल्या पाहिजेत असे स्मिथ यांचे मत होते. आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ झाल्याशिवाय देशाच्या संपत्तीत (श्रीमंतीत) वाढ होणार नाही म्हणून आंतरराष्ट्रीय व्यापारावरील सर्व प्रकारची बंधने काढून टाकली पाहिजेत असा महत्वपूर्ण विचार ॲडम स्मिथ यांनी आपल्या ग्रंथात मांडला आहे. ॲडम स्मिथ यांनी राष्ट्राच्या संपत्तीत जी वाढ होते ती श्रमविभागणीच्या प्रक्रियेवरही अवलंबून असते असे म्हटले आहे. त्यांच्या मते, श्रमविभागणी ही बाजाराच्या आकारावर अवलंबून असते. जसाजसा बाजाराचा विस्तार होत जातो तसतशी श्रमविभागणी वाढत जाते. बाजाराच्या विस्तारावर मर्यादा पडल्या तर श्रमविभागणीच्या प्रक्रियेवरही मर्यादा पडतात. श्रमविभागणीचे फायदे मिळवण्यासाठी बाजाराचा विस्तार घडून आला पाहिजे. त्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विस्तार झाला पाहिजे. आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ घडून आली तर श्रमविभागणीत वाढ होऊन राष्ट्राच्या संपत्तीत वाढ होईल असे ॲडम स्मिथ यांना म्हणावयाचे आहे. अशा प्रकारे ॲडम स्मिथ यांनी देशाचा विकास घडवून आणण्यासाठी, देशाला श्रीमंत व समृध्द आणि सामर्थ्यशाली बनवण्यासाठी (म्हणजेच राष्ट्राच्या संपत्तीत वाढ घडवून आणण्यासाठी) आंतरराष्ट्रीय व्यापार वाढला पाहिजे असे म्हटले आहे. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विस्तार करणे आणि त्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यापारावरील निर्बंध काढून टाकणे असे विचार ॲडम स्मिथ यांनी मांडल्याने त्यांना मुक्त व्यापाराचे किंवा खुल्या व्यापाराचे पुरस्कर्ते असे म्हणतात. व्यापरवाद्यांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराचे लाभ दोन देशापैकी एकाच देशाला होतात असे म्हटले आहे. दोन्ही देशांना आंतरराष्ट्रीय व्यापार फायदेशीर ठरत नाही. एकाच वेळी एकाच देशाला आंतरराष्ट्रीय व्यापार फायदेशीर ठरतो असे व्यापरवादी म्हणतात. आयात कमी करून निर्यात वाढवली तर आंतरराष्ट्रीय व्यापार लाभदायक ठरतो असा विचार व्यापारवाद्यांनी मांडला आहे. या विचारांना ॲडम स्मिथ यांनी विरोध केला. आंतरराष्ट्रीय व्यापार फायदेशीर होण्यासाठी काही उपाय 'राष्ट्राची संपत्ती' या ग्रंथात सुचवले. हा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यानंतर जगावर असणारा व्यापारवाद्यांचा प्रभाव एकदमच कमी झाला. हे स्मिथ यांच्या ग्रंथाचे एक ठळक वैशिष्ट्य सांगता येईल. राष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी (राष्ट्राला श्रीमंत समृध्द बनवण्यासाठी / राष्ट्राच्या संपत्तीत वाढ घडवून आणण्यासाठी) आंतरराष्ट्रीय व्यापार कोणत्या प्रकारचा असला पाहिजे? याची चर्चा ॲडम स्मिथ यांनी आपल्या सिद्धांतात केली आहे. ॲडम स्मिथ यांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराचा जो

सिद्धांत मांडला आहे, त्यास 'आंतरराष्ट्रीय व्यापाराचा केवल लाभ सिद्धांत' किंवा निरपेक्ष लाभाचा सिद्धांत असे म्हणतात.

**ॲडम स्मिथ यांच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या केवल लाभ सिद्धांताची गृहिते**

ॲडम स्मिथ यांचा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा केवल लाभ सिद्धांत खालील गृहितावर आधारित आहे.

**(१) श्रम हा एकच उत्पादनाचा घटक :—**

ॲडम स्मिथ यांनी आपल्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांत श्रम हा एकच उत्पादनाचा घटक असतो असे गृहीत धरले आहे. श्रम या उत्पादन घटकाला स्मिथ यांनी विशेष महत्व दिले आहे.

**(२) दोन देशांचा विचार :—**

आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी असलेलया देशांची संख्या दोन (०२) असते असे गृहीत धरून सिद्धांताची मांडणी केली आहे. ॲडम स्मिथ यांनी दोन देश आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी असतात असे म्हटले आहे

**(३) दोन वस्तूंचा व्यापार :—**

आंतरराष्ट्रीय व्यापारात जे दोन देश सहभागी असतात, ते दोन (०२) वस्तूंचा व्यापार करतात. असे ॲडम स्मिथ यानी गृहीत धरले आहे. उदाहरणार्थ अ आणि ब असे दोन आहेत. आणि क्ष व य अश दोन वस्तू आहेत. अ आणि ब या दोन देशात क्ष आणि य वस्तूंचा व्यापार चालतो. अ हा देश क्ष आणि य वस्तू तयार करतो आणि ब हा देश क्ष आणि य वस्तू तयार करता असे मानता येईल.

**(४) आंतरराष्ट्रीय व्यापार निर्बंधमुक्त आहे :—**

जे दोन देश आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी असतात ते देश आंतरराष्ट्रीय व्यापारावर कोणतेही निर्बंध लादत नाहीत. आंतरराष्ट्रीय व्यापार व्यवहारात दोन्ही देश ढवळाढवळ करत नाहीत. आंतरराष्ट्रीय व्यापार (दोन्ही देशांचा व्यापार) हा मुक्त व्यापार (free trade) आहे.

आंतरराष्ट्रीय व्यापार जर निर्बंधापासून मुक्त असेल तर आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी असलेल्या दोन्ही देशांना आंतरराष्ट्रीय व्यापाराचा लाभ होतो. म्हणून दोन्ही देशांच्या सरकारांनी आंतरराष्ट्रीय व्यापारावर कोणतीही बंधने लादू नयेत. व्यापारवाद्यांनी आंतरराष्ट्रीय व्यापारात एका देशाचा लाभ होतो व दुसऱ्या देशाला लाभ होत नाही असे म्हटले होते. पण जर आंतरराष्ट्रीय व्यापार मुक्त (खुला) असेल, आंतरराष्ट्रीय व्यापारावर कोणतेही निर्बंध नसतील तर आंतरराष्ट्रीय व्यापार दोन्ही देशांना लाभदायक ठरू शकतो असे ॲडम स्मिथ यांनी म्हटले आहे.

**(५) श्रम एकजिनसी असतात. :—**

उत्पादनाचा ‘श्रम’ हा जो एकमेव घटक आहे, तो एकजिनसी असतो असे ॲडम स्मिथ यांनी गृहीत धरले आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी असलेले दोन्ही देशातील श्रमिक एकजिनसी असतात असे ॲडम स्मिथ म्हणतात.

**(६) वस्तूचा विनिमय श्रमाच्या एककावर अवलंबून असतो :—**

ॲडम स्मिथ यांचा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत श्रममूल्य सिद्धांतावर आधारित आहे. वस्तूचे उत्पादन करण्यासाठी किती श्रम खर्च होतात किंवा वस्तूच्या उत्पादनासाठी श्रमाचे किती एकक (Unit) लागतात? त्याचा विचार ॲडम स्मिथ यांनी केला आहे अशा प्रकारे वस्तूची किंमत आणि वस्तूचा विनिमय मोजण्यासाठी श्रम एककाचा वापर स्मिथ यांनी आपल्या सिद्धांतात केला आहे. वस्तूचे मूल्य स्मिथ यांनी श्रमाच्या एककामध्ये सांगितले आहे. एखाद्या वस्तूचे उत्पादन करण्यासाठी किती श्रम दिवस लागले? किंवा किती श्रम तास लागले यावरून वस्तूचा विनिमय आणि वस्तूचे मूल्य मोजता येते असे श्रममूल्य सिद्धांत सांगतो. त्या सिद्धांताचा आधार ॲडम स्मिथ यांनी आपल्या सिद्धांतात घेतला आहे.

एखाद्या वस्तूची किंमत ती वस्तू उत्पादन करण्यासाठी किती श्रम खर्च झाले त्यावरून ठरते. या संदर्भात ॲडम स्मिथ यांनी एक उदाहरण दिले आहे. समजा, शिकारी लोकांचा एक देश आहे. आणि हरणाची शिकार करण्यासाठी जेवढे श्रम खर्ची पडतात, त्याच्या दुप्पट श्रम बीव्हरची (जलचर प्राणी) शिकार करण्यासाठी लागत असतील तर

१= बीव्हरप्राणी = ०२ हरिण असा विनिमय दर होईल. म्हणजे एका बीव्हरचा विनिमय दर दोन हरणांशी होईल. दोन हरणांच्या मोबदल्यात ०१ बीव्हर द्यावा लागेल. बीव्हरची मागणी वाढली तर काही काळापुरता विनिमय दर बदलेल आणि पुन्हा पूर्वीइतका (०१ बीव्हर = ०२ हरिण) असा होईल. समजा बीव्हरची मागणी वाढली तर विनिमय दर ०१बीव्हर = ०३ हरिण किंवा १ बीव्हर = ४ हरिण असा होईल. असे झाले तर बीव्हरची शिकार मोठ्या प्रमाणात होईल आणि हरणांची शिकार कमी प्रमाणात होईल. त्यामुळे विनिमय दर बदलून पुन्हा पूर्वीइतका १ बीव्हर = ०२ हरिण असा होईल. अशा प्रकारे वस्तूचे विनिमय मूल्य (Exchange Value ) वस्तूचे उत्पादन करण्यासाठी किती श्रम खर्ची पडले त्यावरून आणि वस्तूच्या मागणी पुरवठ्यावरून ठरत असते.

**(७) उत्पादनाच्या बाबतीतील कार्यक्षमता कमी—जास्त असते :—**

काही देश दुसऱ्या देशापेक्षा काही वस्तूंच्या उत्पादनाच्या बाबतीत अधिक कार्यक्षम असतात तर काही देश वस्तूंच्या उत्पादनाच्या बाबतीत कमी कार्यक्षम असतात. आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी असलेल्या दोन्ही देशांनी कमी कार्यक्षम असलेल्या वस्तूचे उत्पादन करू नये. तर दोन्ही देशांनी अधिक कार्यक्षम असलेल्या वस्तूंचेच उत्पादन करावे. म्हणजे जो देश ज्या उत्पादनाच्या बाबतीत दुसऱ्या देशापेक्षा अधिक कार्यक्षम आहे त्या देशाने त्या वस्तूचे उत्पादन करावे (किंवा त्या वस्तूच्या बाबतीत विशेषीकरण करावे.) म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापार दोन्ही देशांना फायदेशीर ठरेल असे ॲडम स्मिथ म्हणतात.

**उदाहरणाच्या साहाय्याने स्पष्टीकरण**

ॲडम स्मिथ यांचा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा केवल लाभ सिद्धांत एका उदाहरणाच्या साहाय्याने स्पष्ट करून सांगता येईल. समजा A आणि B असे दोन आहेत. आणि ते X आणि

Y या वस्तूंचे उत्पादन करतात. या दोन्ही वस्तूंचा उत्पादन खर्च श्रमाच्या एककात मोजला आहे.

| देशाचे नाव | X वस्तूच्या १० नगांचा उत्पादन खर्च | Y वस्तूंच्या १० नगांचा उत्पादन खर्च |
|---|---|---|
| A देश | २० श्रम तास | ४० श्रम तास |
| B देश | ४० श्रम तास | २० श्रम तास |

वरील कोष्टकाचे थोडक्यात स्पष्टीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

(१) A या देशाचा X वस्तूच्या १० नगांचा उत्पादन खर्च २० श्रम तास आहे. तर याच देशाचा Y वस्तूचा १० नगांचा उत्पादन खर्च ४० श्रम तास आहे. म्हणजे A या देशाचा X वस्तूचा उत्पादन खर्च कमी आहे. तर Y या वस्तूचा उत्पादन खर्च जास्त आहे.

(२) B या देशाचा X वस्तूचा १० नगांचा उत्पादन खर्च ४० श्रम तास आहे. तर याच देशाचा Y वस्तूचा १० नगांचा उत्पादन खर्च २० श्रम तास आहे. म्हणजे B ह्या देशाचा X वस्तूचा उत्पादन खर्च जास्त आहे. तर Y वस्तूचा उत्पादन खर्च कमी आहे.

(३) A देशाला X वस्तूचे १० नग तयार करण्यासाठी २० श्रम तास लागतात. तर B या देशाला त्याच X वस्तूचे १० नग तयार करण्यासाठी ४० श्रम तास लागतात. याचा अर्थ B देशाच्या तुलनेत A या देशाचा या X वस्तूचा खर्च कमी आहे. कारण A देशाला X वस्तूचे १०नग तयार करण्यासाठी २० श्रम तास लागतात. तर A देशाला X वस्तूचे तेवढेच १० नग तयार करण्यासाठी २० श्रम तास लागतात. A देशाला B देशाच्या तुलनेत X वस्तू तयार करण्यासाठी कमी (निम्मे) श्रम तास लागतात. याचा अर्थ A हा देश X वस्तूच्या उत्पादनाच्या बाबतीत B देशापेक्षा अधिक कार्यक्षम आहे.

(४) A देशाला Y वस्तूचे १० नग तयार करण्यासाठी ४० श्रम तास लागतात. तर B देशाला Y वस्तूचे तेवढेच १० नग तयार करण्यासाठी २० श्रमतास लागतात. याचा अर्थ A देशाच्या तुलनेत B देशाचा Y वस्तू तयार करण्याचा खर्च कमी आहे. Y वस्तूचे १० नग तयार करण्यासाठी B ह्या देशाला २० श्रम तास लागतात. तर A देशाला त्याच्या दुप्पट ४० श्रम तास लागतात. B देशाला A देशाच्या तुलनेत Y वस्तू तयार करण्यासाठी कमी (निम्मे) श्रमतास लागतात. म्हणजे A देशापेक्षा निम्मा खर्चात B हा देश Y वस्तूचे उत्पादन करतो. म्हणून B हा देश Y वस्तूच्या उत्पादनाच्या बाबतीत A देशापेक्षा अधिक कार्यक्षम आहे.

A आणि B ह्या दोन्ही देशांनी दोन्ही वस्तूंचे (X आणि Y चे) उत्पादन केले तर आंतरराष्ट्रीय व्यापाराचा लाभ दोन्ही देशांना मिळणारा नाही. दोन्ही देशांनी दोन्ही वस्तूंचे उत्पादन न करता जो देश ज्या वस्तूच्या उत्पादनाचया बाबतीत दुसऱ्या देशापेक्षा कार्यक्षम आहे त्याच वस्तूचे उत्पादन करावे. ज्या वस्तूच्या उत्पादनाच्या बाबतीत जो देश दुसऱ्या देशापेक्षा कमी कार्यक्षम आहे, त्या वस्तूचे उत्पादन करू नये. A ह्या देशाचा Y वस्तूचा उत्पादन खर्च B देशापेक्षा जास्त आहे. म्हणून A ह्या देशाने Y चे उत्पादन करू ये. B देशाचा Y वस्तूच्या उत्पादन खर्च A देशापेक्षा कमी आहे. म्हणून A या देशाने Y वस्तू तयार न करता X वस्तू तयार करावी. म्हणजे A ह्या देशाने X वस्तूच्या उत्पादनात विशेषीकरण करावे. अशा प्रकारे A आणि B ह्या देशांनी ज्या वस्तूच्या उत्पादनाच्या बाबतीत ते अधिक कार्यक्षम आहेत त्या वस्तूचे उत्पादन केले आणि त्या वस्तूंची एकमेकांना विक्री केली (निर्यात केली) तर असा

आंतरराष्ट्रीय व्यापार दोन्ही देशांना लाभदायक ठरेल. A या देशाला X वस्तूच्या उत्पादनात लाभ मिळतो तर B ह्या देशाला Y वस्तूच्या उत्पादनात लाभ मिळतो.

A या देशाने X वस्तूच्या उत्पादनात विशेषीकरण केले (म्हणजे Y वस्तूचे उत्पादन केले नाही.) आणि B या देशाने Y वस्तूच्या उत्पादनात विशेषीकरण केले म्हणजे X वस्तूचे उत्पादन केले नाही तर दोन्ही देशांना खालील फायदे मिळतील.

(१) A हा देश जास्त उत्पादन खर्च असणाऱ्या Y वस्तूचे उत्पादन करणार नाही. Y वस्तू तो B देशाकडून विकत घेईल.

(२) A हा देश X वस्तूचे अधिक उत्पादन करेल. आणि जादा केलेले उत्पादन तो B देशाला निर्यात करून B ची X वस्तूची गरज भागवेल.

(३) B हा देश X वस्तूचे उत्पादन करणार नाही. कारण A देशाच्या तुलनेत B देशाचा X चा उत्पादन खर्च जास्त आहे. तो A देशाकडून X वस्तू विकत घेईल.

(४) B हा देश Y वस्तूचे अधिक उत्पादन करेल. आणि जादा उत्पादन A देशाला विकेल. अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय व्यापार दोन्ही देशांना लाभदायक ठरेल. अशा प्रकारे जर आंतरराष्ट्रीय व्यापार घडून आला तर आंतरराष्ट्रीय श्रमविभागणीचे फायदे मिळतील A देशातील Y वस्तूचे उत्पादन करणारे श्रमिक X वस्तूच्या उत्पादनात गुंतवले जातील आणि B देशातील X वस्तूचे उत्पादन करणारे श्रमिक Y वस्तूच्या उत्पादनासाठी वापरले जातील.

(५) वरील तक्त्यात व उदाहरणात स्पष्ट केल्याप्रमाणे जर आंतरराष्ट्रीय व्यापार घडून आला तर दोन्ही देशातील उत्पादनात मोठी (लक्षणीय) वाढ घडून येईल. A देशाने X वस्तूचे उत्पादनात विशेषीकरण केलयामुळे व Y चे उत्पादन न केल्याने A देशात X वस्तूचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढेल आणि B देशाने Y वस्तूच्या उत्पादनात विशेषीकरण केल्याने व X चे उत्पादन न केल्याने B देशात Y वस्तूचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढेल. अशा प्रकारे दोन्ही देशात दोन्ही वस्तूंच्या उत्पादनात मोठी वाढ घडून येईल. हा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा एक फायदा सांगता येईल.

(६) या प्रकारे जर दोन्ही देशात आंतरराष्ट्रीय व्यापार घडून आला तर दोन्ही देशातील महागाई कमी होईल. A देशात Y वस्तूचा उत्पादन खर्च जास्त असल्याने Y वस्तूची किंमत जास्त होती. B देशात X वस्तूचा खर्च जास्त असल्याने X वस्तूची किंमत जास्त होती. परंतु ॲडम स्मिथ यांच्या विचारानुसार, जर आंतरराष्ट्रीय व्यापार घडून आला तर दोन्ही देशांना महागाईला तोंड द्यावे लागणार नाही. कारण या सिद्धांतानुसार ज्या वस्तूचा उत्पादन खर्च जास्त आहे त्या वस्तूचे उत्पादन तो देश करत नाही. तर ती वस्तू तो देश आयात करतो. त्यामुळे दोन्ही देशांतील लोकांना महागाईला तोंड द्यावे लागत नाही. त्यामुळे लोकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावतो असे ॲडम स्मिथ यांनी म्हटले आहे.

(७) ॲडम स्मिथ यांच्या सिद्धांतानुसार दोन्ही देशांनी उत्पादन केले व आंतरराष्ट्रीय व्यापारात भाग घेतला तर केवळ दोन्ही देशांच्या उत्पादनात व उत्पन्नात वाढ होत नाही तर जागतिक एकूण उत्पादनात व उत्पन्नात सुद्धा वाढ घडून येते.

अशा प्रकारे जगाचा व्यापार ॲडम स्मिथ यांच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या केवल लाभ सिद्धांतानुसार झाला तर खालील फायदे प्राप्त घेतात.

(अ) आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी सर्व राष्ट्रांचा फायदा होतो. कोणत्याही राष्ट्राचे नुकसान होत नाही.

(ब) दोन्ही देशातील उत्पादनात वाढ होते. जागतिक उत्पादनात व उत्पन्नातही वाढ होते.

(क) स्मिथ यांच्या सिद्धांतानुसार व्यापार घडून आला तर विशेषीकरण व श्रम विभागणीचे फायदे मिळतात.

(ड) विदेशातून वस्तूंची आयात केल्याने महागाई कमी होते.

(ई) राष्ट्राच्या संपत्तीत वाढ घडून येते.

<u>सिद्धांताच्या मर्यादा (Limitations)</u>

अॅडम स्मिथ यांच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांतावर काही अर्थतज्ञांनी टीका केल्या आहेत. त्यांनी या सिद्धांताच्या काही मर्यादा किंवा उणिवा दाखवून दिल्या आहेत. त्या मर्यादा थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केल्या आहेत.

<u>(१) आंतरराष्ट्रीय व्यापारात दोनच देशांचा सहभाग असतो हे चूक</u>

अॅडम स्मिथ यांनी आंतरराष्ट्रीय व्यापारात दोनच देश सहभागी असतात असे म्हटले आहे. टीकाकारांच्या मते, हे चुकीचे आहे. प्रत्यक्षात एक देश इतर अनेक देशाबरोबर व्यापार करत असतो. एक देश अनेक देशांकडून वस्तू खरेदी करत असतो. किंवा एक देश अनेक देशांना वस्तू विकत असतो. परंतु त्याचा विचार स्मिथ यांनी आपल्या सिद्धांतात केलेला नाही.

<u>(२) एक देश दोनच वस्तूंचे उत्पादन करतो हे चूक</u> :—

अॅडम स्मिथ यांचा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत दोन वस्तूंचा गृहितावर आधारित आहे. म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी असलेले दोन देश दोनच वस्तूंचे (उदाहरणार्थ क्ष आणि य किंवा कापड आणि भांडी) उत्पादन करतात असे या सिद्धांत गृहीत धरले आहे हे गृहीत सुद्धा चुकीचे असल्याचे टीकाकारांनी म्हटले आहे. टीकाकार म्हणतात, जगातील अनेक देश केवळ दोनच वस्तूंचे उत्पादन करत नसतात. एक देश दोनपेक्षा अधिक वस्तूंचे उत्पादन करत असतो. परंतु त्याचा विचार अॅडम स्मिथ यांनी आपल्या सिद्धांतात केलेला नाही. एक देश दोनच वस्तू उत्पादन करतो आणि आंतरराष्ट्रीय व्यापारात दोनच वस्तू समाविष्ट असतात असे अॅडम स्मिथ यांनी गृहीत धरले आहे. टीकाकारांच्या मते, हे गृहीत चुकीचे आहे. त्यांच्या मते, एखाद्या देश दोनपेक्षा अधिक वस्तूंची खरेदी—विक्री (आयात—निर्यात) करत असतो.

<u>(३) 'श्रम' हाच उत्पादनाचा एकमात्र घटक हे चुकीचे</u> :—

अॅडम स्मिथ यांनी आपल्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांतात 'श्रम' हाच एकमेव उत्पादनाचा घटक असतो असे म्हटले आहे. टीकाकारांच्या मते, स्मिथ यांचे हे गृहीत चुकीचे आहे. उत्पादनासाठी (वस्तू व सेवा निर्माण करण्यासाठी) केवळ श्रम हा उत्पादनाचा घटक उपयोगी पडत नाही. उत्पादन करण्यासाठी श्रम या घटकाबरोबरच भूमी, भांडवल आणि संयोजक हे घटक सुद्धा महत्त्वाचे व आवश्यक असतात. परंतु श्रमाव्यतिरिक्त उत्पादनाच्या इतर तीन घटकांचा विचार अॅडम स्मिथ यांनी आपल्या सिद्धांतात केलेला नाही. ही या सिदधांताची प्रमुख मर्यादा आहे.

<u>(४) श्रम हा उत्पादनाचा घटक एक जिनसी असतो हे चूक</u> :—

ॲडम स्मिथ यांनी श्रम हा उत्पादनाचा घटक आंतरराष्ट्रीय पातळीवर एकजिनसी असतो असे म्हटले आहे. टीकाकारांच्या मते ॲडम स्मिथ यांचे हे विधान (गृहीत) चुकीचे आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर श्रमिक एकजिनसी नसतात. तसेच एका देशातील सर्व श्रमिक सुद्धा एकजिनसी किंवा एकसारखे नसतात. काही श्रमिकांची कार्यक्षमता जास्त असते तर काही श्रमिकांची कार्यक्षमता कमी असते. परंतु त्याचा विचार ॲडम स्मिथ यांनी आपल्या सिद्धांतात केलेला नाही. सर्व श्रमिक एकजिनसी असतात या चुकीच्या गृहीतावर स्मिथ यांनी मांडलेला सिद्धांत कमकुवत व दोषयुक्त ठरतो.

<u>(५) एका वस्तूंच्या उत्पादनसंस्थेतील श्रमिक दुसऱ्या वस्तू उत्पादनासाठी वापरणे अशक्य</u>

ॲडम स्मिथ यांनी आपल्या सिद्धांतात दोन्ही देश ज्या वस्तूंचा उत्पादन खर्च कमी आहे त्या वस्तूचे उत्पादन करतात आणि ज्या वस्तूचा उत्पादन खर्च जास्त आहे त्या वस्तूंचे उत्पादन करत नाहीत असे म्हटले आहे. स्मिथ यांनी दोन देश आणि दोन वस्तू गृहीत धरून सिद्धांत मांडला आहे. दोन्ही देशांनी दोन वस्तूचे उत्पादन करु नये. एकाच वस्तूचे उत्पादन करावे असे स्मिथ यांनी म्हटले आहे. कोणत्या वस्तूचे उत्पादन करावे? हे सांगताना स्मिथ म्हणतात, एका देशाने अशा वस्तूंचे उत्पादन करावे की ज्या वस्तूचा उत्पादन खर्च दुस—या देशापेक्षा कमी आहे. ज्या वस्तूचा उत्पादन खर्च दुसऱ्या देशाच्या तुलनेत जास्त आहे त्या वस्तूचे उत्पादन बंद करावे. या बंद केलेल्या वस्तूच्या उत्पादनातील सर्व श्रमिकांना ज्या वस्तूचे उत्पादन करण्याचे ठरवले आहे अशा उत्पादनाकडे वळवावे. टीकाकारांच्या मते हे सोपे नाही. कारण Y वस्तूचे उत्पादन बंद केल्यानंतर Y वस्तू तयार करणाऱ्या कामगारांना X वस्तू तयार करण्यास सांगणे सोपे नाही. कारण दोन्ही वस्तूंची उत्पादन पद्धत ही वेगवेगळी असू शकते. सिमेंट तयार करण्याचे काम करणाऱ्या कामगारांना कापड तयार करण्याचे काम दिले तर ते शक्य होणार नाही. परंतु त्याचा विचार स्मिथ यांनी आपल्या सिद्धांतात केलेला नाही.

<u>(६) वाहतूक खर्चाचा विचार केलेला नाही</u> :—

आंतरराष्ट्रीय व्यापारावर केवळ उत्पादन खर्चाचा प्रभाव पडत नाही. तर वाहतूक खर्चाचा सुद्धा प्रभाव पडत असतो. परंतु त्याचा विचार स्मिथ यांनी आपल्या सिद्धांतात केलेला नाही. दोन देशामधील भौगोलिक अंतर खूप लांब असेल तर वस्तूचा वाहतूक खर्च सुद्धा खूप जास्त येईल. त्यामुळे उत्पादन खर्च कमी असूनही आंतरराष्ट्रीय व्यापार लाभदायक ठरणार नाही. परंतु त्याचा विचार स्मिथ यांनी आपल्या सिद्धांतात केलेला नाही.

<u>सारांश</u>

ॲडम स्मिथ यांच्या सिद्धांतावर अशा प्रकारे वरीलप्रमाणे जरी काही टीका केल्या जात असल्या तरी त्यांच्या सिद्धाताचे महत्व कमी होत नाही. ज्या वस्तूचा उत्पादन खर्च कमी आहे त्या वस्तूंचे उत्पादन करावे, ज्या वस्तूचा उत्पादन खर्च जास्त आहे त्या वस्तूंचे उत्पादन न करता त्या वस्तू बाहेरच्या देशातून विकत आणाव्यात आणि आंतरराष्ट्रीय व्यापारावर सरकारची कोणतीही बंधने असू नयेत हे त्यांचे विचार आजही उपयुक्त आहेत.